# सुस्वागतम्

## ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक,२०२०

## मतदान केंद्राध्यक्ष व अधिकारी यांचे प्रशिक्षण

**श्री. महेश पवार**

तहसीलदार यावल तथा

प्राधिकृत अधिकारी,राज्य निवडणूक आयोग

# सुस्वागतम्

## मतदान केंद्राध्यक्ष व
## मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक -२०२०**
**ता. यावल**

# यावल तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणूक सर्वसाधारण माहिती

- आचारसंहिता लागू झाल्याचा दिनांक – ११/१२/२०२०
- सार्वत्रिक निवडणूक (ग्रामपंचायती) - 47
- बिनविरोध झालेल्या ग्रामपंचायती - 00
- निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायती - 47
- एकूण प्रभाग – 177
- एकूण मतदान केंद्र - 204
- नियुक्त केलेले निवडणूक निर्णय अधिकारी - 29

# यावल तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणूक सर्वसाधारण माहिती

- प्रशिक्षण पहिले - दि. 05 / 01 /2021 –मंगळवार
- प्रशिक्षण दुसरे - दि. 09 / 01 /2021 – रविवार
- स्थळ- धनश्री चित्र मंदीर, भुसावळ रोड, यावल
- प्रशिक्षण तिसरे :- मतदान साहित्य ताब्यात घेणे व मतदान केंद्रावर रवानगी,
- दि. 14 / 01 /2021 सकाळी 8: 00 वा.

  स्थळ :- नवीन प्रशासकीय इमारत, सातोद रोड, यावल.

. मतदानाचा दिनांक व वेळ - 15 / 01 / 2021 - शुक्रवार

सकाळी 7:30 ते संध्याकाळी 5:30 वा. पर्यंत.

- मतमोजणी दिनांक – 18 / 01 /2021 - सोमवार सकाळी 10:00 वा.

मतमोजणी ठिकाण :- नवीन प्रशासकीय इमारत, सातोद रोड, यावल.

# निवडणूक विषयक कायदेशीर तरतूदी

1. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1951 च्या कलम 26 च 28 अ च्या तरतूदीनूसार नियुक्ती.
2. निवडणूक घोषीत करण्यात आल्याच्या दिनांकापासून तुम्ही निवडणूक आयोगाच्या प्रतिनियुक्तीवर
3. कर्तव्यात कसूर केल्यास याच अधिनियमाच्या कलम 134 नुसार कारवाई होऊ शकते ही कारवाई दाखलपात्र गुन्हा सदरात मोडते.
4. मतदान केंद्रामध्ये कामकाजावर नियंत्रण ठेवयाचे तुम्हाला संपूर्ण कायदेशीर अधिकार आहेत.
5. निर्भय व नि:पक्षपाती मतदान होईल यासाठी तुम्हाला अत्यंत महत्वाची जबाबदारी बजावयची आहे.
6. तुमच्या मतदान केंद्रावर घडणाऱ्या सर्व घटनांची जबाबदारी तुमच्यावर आहे.

# प्रशिक्षण

- मतदान यंत्र हे निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी या सर्वांना चालविता येणे अनिवार्य.
- मतदान यंत्र प्रत्यक्षात हाताळुन पहावे.
- प्रात्यक्षीक घ्यावे.

# महत्वाचे बदल

1. सरपंच निवड जनतेतून नाही.
2. एक CU व एक किंवा अधिक BU
3. मतदाराने प्रभाग निहाय उमेदवार निवडून द्यावयाचे आहे .

# निवडणूक मतदान अधिकारी कामकाज

- निवडणूक साहित्य ताब्यात घेणे
- मतदान दिवस- प्रत्यक्ष मतदाना पुर्वीची तयारी
- प्रत्यक्ष मतदान
- मतदान  सुरू असताना करावयाची कार्यवाही
- मतदान संपले नंतरचे कामकाज

# निवडणूक साहित्य ताब्यात घेणे

दि. 14/01 /2021 सकाळी 08:00 वा

स्थळ :- नवीन प्रशासकीय इमारत, सातोद रोड, यावल.

# निवडणूक साहित्य ताब्यात घेणे


- साहित्य वितरण केद्रावर वेळेवर उपस्थित राहुन दिलेल्या यादीनुसार साहित्य ताब्यात घेऊन खात्री करावी.
- कन्ट्रोल युनिट व बॅलेट युनिट वरील धातुचे लेबल व स्टीकर वरील लेबल वरील मशिन क्रमांक सारखा आहे याची तपासणी करावी.
- हिरव्या रंगाच्या स्टीकर वर नमुद केलेला मतदान केंद क्रमांक व ADDRESS TAG वर असलेला मतदान केद्र क्रमांक सारखाच असल्याची खात्री करावी.



# निवडणूक साहित्य  ताब्यात घेणे

- नियंत्रण युनिट वरील कॅन्डीडेट सेट सेक्शन सिल करून ADDRESS TAG लावले आहे का? हे पहाणे
- नियंत्रण युनिट वरील Display बरोबर असल्याची खात्री करावी
- नियंत्रण युनिट ची तपासणी केल्यानंतर नियंत्रण युनिट च्या मागिल बटन बंद करावे
- नेमून दिलेल्याच मतदान केंद्राचे आहे का ?
- नेमूण दिलेल्याच ग्रामपंचायत प्रभाग साठी आहे का ?

# नियंत्रण युनिट Control unit





नियंत्रण विभाग Control Unit - पुढची बाजू

# नियंत्रण युनिट भाग (C.U.)

- **Display section** (दर्शक भाग)
- **Candidate set section** (कँडीडेट सेट सेक्शन)
- **Result section** (रीझल्ट सेक्शन)
- **Ballot section** (बॅलेट सेक्शन)

# नियंत्रण युनिट भाग (C.U.)




नियंत्रण विभाग Control Unit Display section- दर्शक विभाग

# DISPLAY SECTION (डीस्प्ले सेक्शन)

1. अ) दोन दिवे –

1) ऑन लॅम्प

हिरवा रंगाचा

डाव्या बाजुला

2) बिझी लॅम्प

लाल रंगाचा

उजव्या कोपऱ्यात

मतदान होईपर्यंत सुरु असतो

# DISPLAY SECTION (डीस्प्ले सेक्शन)

**ब) दोन डिजीट डिस्प्ले पॅनल या पॅनलवर निरनिराळया प्रकारची आकडेवारी असते.**

1) **LE – Link error केबल व स्लाइड स्विच व्यवस्थित जोडावे**

2) **PE – Press error बटन कायम दबलेले असते .**

3) **ER – Memory error-हे CU मतदानासाठी योग्य नाही हे दर्शविते**

**क) फोर डिजीट पॅनेल**

1) **No – CU वरील बटन योग्य त्या नूसार दाबले नाही.**

2) **End – क्रमानुसार Close, Result, Clear दाबल्यावर**

# DISPLAY SECTION (डीस्प्ले सेक्शन)

ड) दोन्ही पॅनल वरील दर्शक –

एकाच वेळी दोन्ही दर्शक पॅनेलवर वेगवेगळी दृश्य दर्शविली जातात.

np-2 निवडणूक यंत्र दोन पदांच्या निवडणूकी साठी आहे.

P1,07-2 सात उमेदवार आहेत त्यापैकी दोन निवडायचे आहे.


P2,05-1 पाच आहेत त्या पैकी दोन निवडायचे आहेत.


to 1487 ऐकूण झालेले मतदान.

02-235 दुस-या क्र. च्या उमेदवारास – 235 मते मिळाले.


# नियंत्रण युनिट Control unit


## नियंत्रण विभाग Control Unit - Result Section







# स्पेशल टॅग






पुढचा भाग




पाठीमागील भाग

# पट्टी मोहोर STRIP SEAL

1. हे सील 23.5 इंच लांब व 1 इंच रुंद असते व ते नियंत्रण विभागाभोवती गोल फिरवून चिकटवायचे असते.
2. प्रत्येक पट्टी सील वर विशिष्ट अनुक्रमांक असतो.
3. पट्टी सील वर A, B, C & D असे 4 डिंक लावलेले भाग असतात व त्यावर मेणाचा कागद लावलेला असतो.
4. मतदानापुर्वी नियंत्रण विभागाच्या रिझल्ट सेक्शन भोवती गुलाबी कागदी मोहोरेस जोडून हे पट्टी सील गुंडाळावयाचे असते.

# Candidate Set Section (कँडीडेट सेट सेक्शन.)

- हे **Section** सील बंद असते
- कुठल्याही परिस्थितीत उघडू नये


# Result Section रीझल्ट सेक्शन

- दोन कप्पे असतात
- डावीकडील कप्प्यात Close बटन
- उजवीकडील कप्प्यात दोन बटने Result-I व Result -II
- हा भाग स्वतंत्र पट्टीच्या साहाय्याने झाकलेला असतो

# नियंत्रण विभाग Control Unit - मागील बाजू

Power Switch

Socket for Interconnecting Cable of Balloting unit



Socket for connecting Auxiliary Control Unit. At present this HAS NO USE.

DO NOT USE THIS SOCKET

# कंट्रोल यूनिटचा मागील भाग

- या भागात एक पटटी असते
- लॅच खाली दाबून उघडता येतो व दोऱ्याचे सील असत
- बॅलेट युनिटची केबल जोडायची असते
- पॉवर स्वीच असतो

# Ballot Section (बॅलेट सेक्शन)

1) टोटल बटन - काळे असते

2) बॅलेट बटन -राखाडी रंगाचे मोठे बटन असते


3) बझर - छिद्रे असलेला जाडीदार भाग ज्यातुन आवाज येतो


# बीप टोन

माहिती नुसार शिटी चा आवाज होतो

1. दोन सेकंदाचा बीप साऊंड – मतदाराने मतदान केल्या नंतर
2. दोन सेकंदाचा बीप साऊंड डिस्प्ले पॅनेलवरील माहिती बदलल्या बरोबर होतो.
3. C U वरील बटन क्रमानुसार दाबले नसल्यास ४ सेकंद बीप साऊंड येतो


# कंट्रोल युनिट वरील बटनांचा वापर



# मतदान यंत्र Ballot Unit

## Ballot Unit - Details



# मतदान यंत्र Ballot Unit

बॅलेटींग यूनिट मधील भाग

1. कंट्रोल यूनिट ला जोडणारी केबल
2. मतदान यंत्र मतदानासाठी तयार असल्याचे दर्शविणारा दिवा.
3. स्लाईड स्विच पॅनेल
4. मत पत्रिका ठेवण्याचा पारदर्शक भाग
5. उमेदवारांचे बटने व त्यासमोरील लाल दिवे.

**SLIDE SWITCH एक वर असलेले BU सर्वात आधी CU ला जोडावे तदनंतर SLIDE SWITCH 2 असे असलेले BU एक नंबर च्या BU शी जोडावे या प्रमाणे जोडणी करावी.**

# मतपत्रिका

- मतदान यंत्र प्रभागनिहाय  तयार करणेत येईल.
- प्रभागनिहाय व संवर्गनिहाय मतपत्रिका रंग

  अ.अनुसूचित जाती   :- फिका गुलाबी रंग

  ब.अनुसूचित जमातीं :- फिका हिरवा रंग

  क. नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता:- फिका पिवळा रंग


  ड. सर्वसाधारण उमेद्वारांकरिता :- पांढरा रंग

- स्त्री राखीव :- संवर्गनिहाय मतपत्रिकेचा रंग व स्त्री राखीव असे नमूद


# मतदान यंत्राचे अनुक्रमांक

- प्रत्येक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे नियंत्रण विभाग व मतदान विभागाला विशिष्ट अनुक्रमांक देण्यांत आलेला आहे.
- अनुक्रमांकाची नोंद आवश्यक त्या नमुन्यात उदा. मतदान केंद्राध्यक्षांची डायरी- अ.क्र 7(2 ) व 7(4) वर तसेच ॲ्ड्रेस टॅग वर घेणे आवश्यक आहे.

# ॲड्रेस टॅग


ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२०, यावल
नियंत्रण विभाग / मतदान विभाग अनुक्रमांक : .......
मतदान केंद्राचा क्रमांक व नाव : .......................
मतदानाची तारीख
१५/०१/२०२१

# इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची पेटी



**पेटी - नियंत्रण विभाग (कंट्रोल युनिट)**　　**पेटी - मतदान विभाग (बॅलेट युनिट)**

# जोडपत्र –चार
# मतदान केंद्रासाठी मतदान साहित्याची यादी

| | | |
|---|---|---|
| 1 | नियंत्रण युनिलट (कंट्रोल युनिट) | 1 |
| 2 | मतदान युनिट (बेलेट युनिट्स) | 1 (उमेदवारांच्या संख्येवर अपलंबून) |
| 3 | मतदारांची नोंदवही (नमुना व्हीएम-1) | 1 |
| 4 | मतदार स्लीप | मतदारांच्या संख्येवर अवलंबून |
| 5 | मतदार यादीच्या कार्यप्रती | 3 |
| 6 | मतपत्रिका (प्रदत्त मतांसाठी) | 20 |
| 7 | मार्कर पेन | 2 |
| 8 | कंट्रोल युनिटसाठी खूण चिठ्ठी (ऍड्रेस टॅग) | 5 |
| 9 | बेलेट युनिटसाठी खूण चिठ्ठी (ऍड्रेस टॅग) | 4 |
| 10 | स्पेशल टॅग | 3 |
| 11 | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी गुलाबी कागदी मोहोर | 4 |
| 12 | पट्टी सिल (स्ट्रिप सील) | 3 |
| 13 | बाणफुली चिन्ह आलेला रबरी शिक्का | 1 |
| 14 | शाई असलेले पॅड (जांभळी) | 1 |
| 15 | मतदान केंद्राध्यक्षांसाठी धातुची मोहोर | 1 |
| 16 | आगपेटी | 1 |
| 17 | मतदान केंद्राध्यक्षांची दैनंदिनी | 1 |
| 18 | विभेदक चिन्ह असलेला रबरी शिक्का | 1 |

| | | |
|---|---|---|
| 19 | नमुने-<br>1) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी<br>2) आक्षेपित मतांची यादी<br>3) अंध व अपंग मतदारांची यादी (नमुना व्हीएम-5)<br>4) प्रदत्त मतांची यादी (नमुना व्हीएम-2)<br>5) नोंद झालेल्या मतांचा हिशोब (नमुना व्हीएम-3 भाग -1)<br><br>1) वापरण्यात आलेल्या कागदी मोहोरांचा अभिलेख<br>2) आक्षेपित मतांची फी जमा करण्यासाठी पावती<br>3) पोलिस बल्लारपूर अंमलदाराला पत्र<br>4) मतदान केंद्राध्यक्षांव्दारे करण्यात येणारी घोषणापत्र मतदान सुरू होण्यापूर्वी ,मतदान संपल्यावर,दुसरे मतदान यंत्र होण्यापूर्वी वापरदताना, यंत्र सील करताना<br>5) मतदारांना त्यांच्या वयाविषयी घोषणापत्र करण्यासाठी फॉर्म<br>6) घोषणापत्र दिल्यावर मतदान करण्यासाठी दिलेल्या वयाविषयी घोषणापत्र देण्यास नकार दिलेल्यानंतर मतदा मतदारांची यादी<br>7) अंध व विकलांग मतदाराच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र<br>8) मतदान प्रतिनिधींसाठी पासेस | <br>1<br>2<br>2<br>2<br>(10 किंवा उमेदवारांची संख्या अधिक 3)<br>2<br>1 पुस्तक<br>4<br>2<br>1<br><br>2<br><br>2<br><br><br>4<br>10 |

| | | |
|---|---|---|
| 20 | लिफाफे- | |
| | 1) लहान लिफाफयांकरिता (सांवधानिक लिफाफे )(एस.ई.8) | 1 |
| | 2) मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीसाठी (एस.ई.8) | 1 |
| | 3) मतदार यादीच्या इतर प्रतीसाठी (एस.ई.8) | 1 |
| | 4) प्रदत्त मतदानपत्रिका व प्रदत्त मतदाराच्या यादीसाठी | 1 |
| | 5) मतदान सुरू होण्यापूर्वी व मतदान संपल्यावर मतदान केद्राध्यक्षाव्दारे | 1 |
| | 6) नोंद केलेल्या मतांच्या हिशोबासाठी (नमुना व्ही.एम-3) (एस.ई.5) | 2 |
| | 7) आक्षेपित मतांच्या यादीसाठी (एस.ई.5) | 1 |
| | 8) न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहोरांसाठी (एस.ई.5) | 1 |
| | 9) मतदान प्रतिनिधीच्या नंमणूक पत्रासाठी (एस.ई.6) | 1 |
| | 10)अंध व विकलांग मतदारांच्या यादीसाठी (एस.ई.6) | 1 |
| | 11)मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीच्या अहवालाकरीता (एस.ई.6) | 1 |
| | 12)निवडणूक कार्य प्रमाणपत्राकरिता (एस.ई.5) | 1 |
| | 13)पावती पुस्तके व समपहरण केलेल्या सकमेसाठी (एस.ई.6) | 1 |
| | 14)सहकाऱ्याच्या घोषणापत्रासाठी (एस.ई.5) | 1 |
| | 15)लहान लिफाफे (इतर) (एस.ई.7) | 2 |

| | | |
|---|---|---|
| 20 | 1) मतदारांची स्वाक्षरी असलेल्या मतदारांच्या नोंदवही –करिता (नमुना व्हीएम-1) (एस.ई.8) | 1 |
| | 2) इतर संबंधित कागदपत्रांसाठी (एस.ई.5) | 1 |
| | 3) लहान लिफाफे (एस.ई.8)) | 1 |
| | 4) केंद्राध्यक्ष्याच्या दैनंदिनीकरीता लिफाफा (एस.ई.6) | 1 |
| | 5) कोरे लिफाफे (एस.ई.7)-2, (एसई.8)-3 | 1 |
| | 6) न वापरलेल्या मतपत्रिकांसाठी (एस.ई.7) | 1 |
| | 7) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, मोहोरबंद असलेल्या लिफाफयामध्ये अन्य कोणतेही पेपर ठेवण्याचे ठरविले आहे, त्यासाठी | 5 |
| | 8) न वापरलेल्या व खराब झालेल्या विशेष टॅगसाठी लिफाफा (एस.ई.7) | 1 |
| | 9) न वापरलेल्या व खराब पट्टीसाठी (स्ट्रीप सिल) लिफाफा (एस.ई.7) | 2 |
| | 10)मतदार स्लीप्स ठेवण्याकरिता (एस.ई.7) | 2 |

| | | |
|---|---|---|
| 21 | **सूचना फलक- (अ) मतदान केंद्राध्यक्ष (ब) मतदान अधिकारी (क) प्रवेश (ड) बाहेर (इ) मतदान प्रतिनिधी (फ) संकीर्ण सूचना विनिदिर्ष्ट करणारे** | |
| 22 | लेखनसामग्री.<br>1) साधी पेन्सिल<br>2) बॉलपेन<br>3) कोरेकागद<br>4) टाचण्या (पीन्स )<br>5) लाख<br>6) मतदान कक्षासाठी साहित्य<br>7) डिंक (गम पेस्ट)<br>8) ब्लेड<br>9) मेणबत्या<br>10) धातूची पट्टी<br>11) जाड दोरा (Thin Twine Thread)<br>12) कार्बन पेपर<br>13) पॅकेजिंग कागद –<br>14) तेल इत्यादी पुसण्यासाठी कापड किंवा चिंधी<br>15) पक्कया शाईची बाटली ठेवण्यासाठी कप<br>16) ड्रॉईग पिन<br>17) पडताळणी सूची<br>18) रबर बॅन्डस<br>19) सेलो टेप | 1<br>3 निळे<br>8 मोठे तुकडे (शिट्स)<br>25 नग<br>6 कांडया<br>2+2=4<br>1 बाटली<br>1<br>4<br>1<br>20 मीटर<br>3<br>2 शीट<br>3<br>1<br>24 नग<br>2<br>20<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1<br>1 |



दि. १४ /०१/२०२१ रोजी

# मतदान केंद्रावर पोहोचल्यानंतर करावयाची कार्यवाही

ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२० ता. यावल


# मतदान पथकाची स्थापना व तालीम

- मतदान केंद्र स्वछता, सुविधा, फर्निचर यांची प्राथमिक तपासणी
- मतदान पथक
- मतदान केंद्राध्यक्ष
- मतदान अधिकारी क्रमांक 1
- मतदान अधिकारी क्रमांक 2
- मतदान अधिकारी क्रमांक 3
- पोलीस कर्मचारी
- मतदान केद्रांध्यक्ष- अपरिहार्य कारणामुळे गैरहजर
- मतदान अधिकारी क्रमांक 1 हे मतदान क्रेद्रांध्यक्षाचे काम करण्यास प्राधिकृत

# मतदान केंद्राबाहेर नोटीस

- मतदान केंद्राच्या बाहेर 100 व 200 मीटर अंतरावर पांढ-या चुण्याने मर्यादा रेषा आखाव्यात
- मतदान क्षेत्राचा तपशिल नोटीस
- आत व बाहेर जाण्याचा मार्ग
- BALLOT पेपर नमुना मतपत्रिका
- इशारा
- धुम्रपान

# मतदान केंद्र तयार करतांना सर्वसाधारणपणे खालील दर्शविल्या प्रमाणे बैठक व्यवस्था करावी.



# आदर्श मतदान केंद्राची रचना





- मतदान केंद्रा बाहेर मतदारांना थांबण्यासाठी पुरेशी जागा
- स्त्री व पुरूषांना थांबण्यासाठी वेगवेगळी जागा
- एकच मार्ग- मध्ये दोरी बांधणे
- मतदारांचा केंद्रातील रहदारीचा ओघ व्यवस्थित उलट सुलट नको.
- पोलीस कर्मचारी तैनात असावा

# मतदान कक्ष

- मतदार मतदान कक्षातील कोणते बटण दाबतो ते दृष्टीस पडणार नाही.
- मतदाराला मतनोंदवीतांना अडचण येणार नाही.
- केबलचे नुकसान अथवा बिघाड करणार नाही याकडे लक्ष.
- मतदानाची गुप्तता भंग होणार नाही अशा प्रकारचे केबलसाठी छिद्र
- राजकीय पक्षांचे, नेत्यांचे फोटो व निवडणुकीशी संबधीत घोषणा काढुन टाकणे.



दिनांक १५ /०१ /२०21 रोजी

# मतदान सुरु होण्यापूर्वी अनुसरावयाची कार्यपध्दती

ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक -२०२० ता. यावल


# मतदान सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर करावयाची तयारी

१. बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट पेटीमधून काढून घ्या

२. बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट जोडून घ्या

३. कंट्रोल युनिट चा मागील कप्पा उघडून मशिन सुरु करा


४. सुरूवातीला रिजल्ट सेक्शनचा बाहेरील भाग व नतंर आतील भाग उघडा









# मतदान प्रतिनिधींना Clear Button दाबून या अगोदर एकही मतदान झाले नसल्याचे दाखवा



मॉक पोल (अभिरुप मतदान) video 1

मॉक पोल (अभिरुप मतदान) video 2

# मॉक पोल (अभिरुप मतदान)

1. बॅलेट देण्यात यावे आणि बॅलेट युनिटवर मतदान करण्यात यावे.
२. जेवढे उमेदवार असतील त्या सर्वांना एकदा मतदान करण्यात यावे.
3. Close button दाबून मॉक पोल बंद करण्यात यावे.
४. बॅलेट चे बटन दाबून आता मत नोंदविले जात नसल्याची खात्री करुन घ्या.









# मॉक पोल (अभिरुप मतदान) रिझल्ट




- रिजल्ट १ बटन दाबून मॉक पोल रिझल्ट दाखवा

# मॉक पोल (अभिरुप मतदान)
## बटनाचा मॅप



# कंट्रोल युनिट
# प्रत्यक्ष मतदाना करिता सिंलीग करणे

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक -२०२०, यावल**

# प्रत्यक्ष सिंलीग करणे

१. मॉक पोल मधील रिझल्ट बघितल्यानतंर clear चे बटन दाबून मशिन clear करा.

२. नतंर पाठीमागचा कप्पा उघडून मशिन बंद करा.

३. बाहेरील बाजूच्या छिद्रातून कागदी मोहरेचे हिरवा पुष्ठभाग दिसेल अशा प्रकारे लावा.

४. आतील दार घटट दाबून बंद करा व कागदी मोहर चे दोन्ही टोक बाहेर डोकावतील अशा रितीने बंद करा.








१. केंद्राध्यक्षांनी हिरव्या मोहरच्या पांढ-या पुष्ठभागावर सही करावी.

२. उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना सही करण्यास सांगावी.


३. हिरव्या कागदी मोहर चा अनुक्रमांक नमुना व्हि एम ३ मध्ये नोंदून घ्यावा.



१. धाग्याने आतील दरवाजा बंद करावे


२. विशेष टॅगच्या वरच्या बाजुला असलेल्या छिद्रातून धागा ओवून घ्यावा व सिल करावे

३. विशेष टॅग हा अतील भागात असा ठेवावा की close बटनसाठी असलेले छिद्र त्याच ठिकाणी योग्यरित्या लावावे









- पटटी मोहरचा A भाग हिरव्या कागदी मोहरच्या तळाजवळ ठेवून कागदी मोहरचा बाहेरील भाग आतील स्तरावर ठेवावा



- पटटी मोहरचा B कागदी मोहरच्या हिरव्या भागावर लावावा.




- B भाग चिटकवल्यानतंर पुर्वीच डिंक लावलेला C भाग येईल त्यावरील मेनकागद काढा. हिरव्या कागदी मोहरचा C भागाला घटट चिटकवा.



- पटटीसील उजव्या बाजूने गुंडाळत आणुन D भाग हिरव्या मोहरेवरती घटटपणे दाबा.



# प्रत्यक्ष मतदान

## दिनांक   १५/०१/२०२१

## सकाळी ०७:३० ते सायंकाळी ०५:३० वाजेपर्यंत

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक -२०२०  ता. यावल**

# मुक्त आणि नि:पक्षपाती निवडणूक खबरदारी

- मतदान सुरू होण्यापुर्वी जोडपत्र सहा मधील घोषणापत्राचे वाचन करावे
- नवे मतदान यंत्र वापरण्याची परिस्थीती उदभवल्यास जोडपत्र सहा अ प्रतिज्ञा पत्राचे पुन्हा वाचन करावे.

# जोडपत्र सहा

# मतदानास  प्रारंभ होण्या पुर्वी मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे घोषणापत्र

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका -२०२०  ता. यावल**

# मतदान अधिका-यांची
# मतदान केंद्रावरील कर्तव्य व कामे.

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका -२०२० ता. यावल**

# पहिला मतदान अधिकारी

- मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीचा प्रभारी-

मतदार यादीमध्ये कुठल्याही प्रकारची खाडाखोड अथवा मार्कींग नाही याची खात्री मतदान सुरु होण्या पुर्वी मतदान प्रतिनिधीना करुन द्यावी

- मतदाराचे नाव मतदार यादीमध्ये शोधणे
- मतदराचे नाव मोठयाने वाचून दाखवणे
- निवडणुक आयोगाने विहित केलेले पुरावे, ईपीक, व इतर पुरावे
- मतदाराची ओळख पटविण्याची जबाबदारी



# पहिला मतदान अधिकारी

- आव्हानित व प्रदत्त मतदार आल्यास मतदान केंद्राध्यक्षांकडे पाठवावी.
- सरपंच पदासाठी एक व प्रभागातील निवडूण द्यावयाच्या संख्येची व मतदान करण्याची माहिती दया

➢ पुरुष मतदार- तिरपी रेष

➢ स्त्री मतदार- तिरपी रेष व अनुक्रमांकाला गोल करावे

- झालेल्या मतदानापैकी स्त्री व पुरूष मतदारांची संख्या काढणे

# चिन्हांकित मतदार यादी नमुना

## अंतिम मतदार यादी

**दमामे**
प्रभाग क्र : १ – प्रभाग क्रमांक १
यादी भाग क्र. ३४९ : १ – वडाचीवाडी दमामे

**1** RIW3216496 263/349/1
मतदाराचे पूर्ण नांव : **हरावडे वर्षा बबन**
पतीचे नाव : **हरावडे बबन**
घर क्रमांक : २U
वय : ४६ लिंग : **स्त्री**




**2** RIW6311716 263/349/2
मतदाराचे पूर्ण नांव : **इटले भागोजी रामचंद्र**
वडिलांचे नाव : **इटले रामचंद्र**
घर क्रमांक :
वय : ४८ लिंग : **पु**



**3** RIW6311724 263/349/3
मतदाराचे पूर्ण नांव : **इटले किसन रामचंद्र**
वडिलांचे नाव : **इटले रामचंद्र**
घर क्रमांक :
वय : ३८ लिंग : **पु**



**4** MT/02/010/0516317 263/349/4
मतदाराचे पूर्ण नांव : **घडवळे लक्ष्मी बारकू**
पतीचे नाव : **घडवळे बारकू**
घर क्रमांक : १०
वय : ६१ लिंग : **स्त्री**




**5** RIW3075595 263/349/5
मतदाराचे पूर्ण नांव : **शिगवण लक्ष्मी बारकू**
पतीचे नाव : **शिगवण बारकू**
घर क्रमांक : ११
वय : ६१ लिंग : **स्त्री**



**6** RIW7098296 263/349/6
मतदाराचे पूर्ण नांव : **शिगवण श्वेता सुनिल**
पतीचे नाव : **शिगवण सुनिल**
घर क्रमांक : ११
वय : ३१ लिंग : **स्त्री**



**7** RIW3075629 263/349/7
मतदाराचे पूर्ण नांव : **शिगवण कविता नारायण**
पतीचे नाव : **शिगवण नारायण**
घर क्रमांक : १२
वय : ५० लिंग : **स्त्री**



**8** GHB1402031 263/349/8
मतदाराचे पूर्ण नांव : **शिगवण सिता बबन**
पतीचे नाव : **शिगवण बबन**
घर क्रमांक : १४
वय : ५६ लिंग : **स्त्री**



**9** MT/02/010/0516506 263/349/9
मतदाराचे पूर्ण नांव : **शिगवण अनिता अंबाजी**
पतीचे नाव : **शिगवण अंबाजी**
घर क्रमांक : १७
वय : ६४ लिंग : **स्त्री**



**10** RIW3266343 263/349/10
मतदाराचे पूर्ण नांव : **हरावडे विनायक गणपत**
वडिलांचे नाव : **हरावडे गणपत**
घर क्रमांक : १९
वय : ६६ लिंग : **पु**



**11** MT/02/010/0516482 263/349/11
मतदाराचे पूर्ण नांव : **हरावडे वनिता विनायक**
पतीचे नाव : **हरावडे विनायक**
घर क्रमांक : १९
वय : ६१ लिंग : **स्त्री**




**12** MT/02/010/0516343 263/349/12
मतदाराचे पूर्ण नांव : **हरावडे कविता गणपत**
पतीचे नाव : **हरावडे गणपत**
घर क्रमांक : ५५ A
वय : ४८ लिंग : **स्त्री**




**13** MT/02/010/0516349 263/349/13
मतदाराचे पूर्ण नांव : **हरावडे सुनिता वासुदेव**
पतीचे नाव : **हरावडे वासुदेव**
घर क्रमांक : १९
वय : ६४ लिंग : **स्त्री**



**14** RIW3075710 263/349/14
मतदाराचे पूर्ण नांव : **हरावडे रमेश गणपत**
वडिलांचे नाव : **हरावडे गणपत**
घर क्रमांक : १९
वय : ४३ लिंग : **पु**




**15** GHB1402213 263/349/15
मतदाराचे पूर्ण नांव : **हरावडे रविना रमेश**
पतीचे नाव : **हरावडे रमेश**
घर क्रमांक : १९
वय : ३९ लिंग : **स्त्री**



# दुसरा मतदान अधिकारी

- मार्कर पेनचा प्रभारी
- मतदाराच्या डाव्या हाताचे तर्जनीवर मार्कर पेन / पक्की शाईची खुन किंवा  डाग नाही हे तपासणे



- मतदार नोंदवही – व्हीएम 1
- मतदार नोंदवहीतील अनुक्रमांक
- मतदाराची सही किंवा अंगठा



- ओळखीच्या पुराव्याची नोंद शेरा कॉलम मध्ये घ्या
- मतदारास मतदान चिठ्ठी देणे मतदार यादी व नोंदवहीतील अनुक्रंमाक लिहावे

# दुसरा मतदान अधिकारी

**मतदाराने मतप्रक्रियेचा भंग केला किंवा सही/अंगठयास नकार दिला तर मतदान चिठ्ठी देऊ नये .**

**मतदार नोंदवहीत नोंदी घेत्यानंतर मतदान प्रक्रियेचा भंग केल्यास**

1. **मतदान करु देवू नये**
2. **मतदान चिठठी परत घ्यावी व रदद केल्याबाबत तशी नोंद घ्यावी**
3. **मतदार नोंदवहीत स्वाक्षरी करण्यास प्रतिबंध, अशी नोंद करुन संबधीत मतदाराची स्वाक्षरी घ्या व त्यापुढे आपली स्वाक्षरी करावी.**

**केंद्राध्यक्षांनी याची नोंद केंद्राध्यक्षांचे दैनदिनीत न चुकता घ्यावी.**

# दुसरा मतदान अधिकारी

- जर प्रदत्त मतदार आल्यास त्यांची नोंद नमुना व्हीएम-2 मध्ये घ्यावी.
- बाणफुलीच्या सहाय्याने मतदान करण्यास सांगावे.
- घडी घातलेली मतपत्रिका केंद्राध्यक्षांकडे जमा करणे बाबत सांगावे.

  (शक्यतो प्रदत्त मतदार केंद्रयाध्यक्षांकडेच पाठवावे.)
- चिठ्ठी देण्यापूर्वी मतदाराच्या बोटावर मार्कर पेनची शाई तपासावी.

# दुसरा मतदान अधिकारी

- मतदान संपल्यानंतर मतदार नोंदवही (व्हीएम-1) च्या शेवटच्या नोंदी खाली लाल रंगाने रेष मारावी व मतदान समाप्त झाल्याची नोंद करुन नोंदी समोर उपस्थित मतदान प्रतिनिधी, मतदान अधिकारी क्र.2 व केंद्राध्यक्षांनी सही करावी.
- CU वरील TOTAL बटन दाबुन व्हीएम-1 मधील मतदार व EVM मधील मतदार संख्या जुळती आहे का? हे तपासावे

# तिसरा मतदान अधिकारी

- **CU चे प्रभारी**

**•दुसऱ्या मतदान अधिका-याने दिलेली मतदान चिठ्ठी ताब्यात घेणे**

- **शाई च्या खूणे बाबत खात्री करावी.**

**•नियंत्रण युनिटचे ( CU) Ballot Button दाबून मतदान यंत्र सुरु करणे**

**•मतदाराला मतदान कक्षात जाण्याची परवानगी व मतदान केले बाबतची खात्री करावी.**

# मतदान केंद्राध्यक्ष

- मतदान केंद्रात पोहचण्यासाठीचा मार्ग, साधन व वेळेचा निश्चीत अराखडा यांची माहिती करून घ्या.
- मतदान यंत्र संबधीत कक्षात ठेवणे
- साहित्य उघडयावर राहणार नाही याची काळजी व EVM ची जबाबदारी
- पोलीसाच्या ताब्यात साहित्य देवून मतदान केंद्र सोडता येणार नाही
- मतदान अधिकारी कोणत्याही परिस्थीतीत स्थानिक लोकांच्या आश्रयाला जाणार नाही

# मतदान केंद्राध्यक्ष

- मतदान केंद्रात बुरखाधारी महिला मतदार येणार असतील तर तर्जनीवर शाई तसेच ओळख पटविण्यासाठी महिला अधिकारी टिम मध्ये आहे याची खात्री करावी
- मतदान युनीट व नियंत्रण युनीटची जोडणी लक्ष पुर्वक करा
- दिनांक 14 / 01 /2021 रोजी मतदार केंद्राची रचना करुन रंगीत तालीम
- Mock Poll: मतदानाच्या पूर्वी (दि 15 / 01 /2021) सकाळी 6:00 वा. सुरु करावे.

# मतदान केंद्राध्यक्ष

- आव्हानीत / आक्षेपीत – मतदार
- प्रदत्त मतदार
- अंध अपंग मतदार
- वयाबाबत साशंकता असलेले मतदार याबाबत कार्यवाही
- मतदानास सुरुवात सकाळी 7:30 वा
- कोणताही मतदार मतदान न करता निघून जाऊ नये –दक्षता

# मतदान केंद्राध्यक्ष

- मतदानाची टक्केवारी दर 2 तासांनी दयावी व नोंद ठेवावी
- व्ही.एम.-3 च्या प्रती मतदान प्रतिनिधीना मतदानाच्या शेवटी  देणे
- नियंत्रण युनिटचे (CU) Close Button बंद करण्यास विसरु नये
- विहित प्रपत्र भरणे
- B.U. व C.U. वेगळे करुन संबधीत पेटयांमध्ये ठेवणे
- मतदान साहित्य जमा करणे.

# मतदान केंद्रात प्रवेशाचा हक्क

- निवडणूक कर्तव्या वरील अधिकारी / कर्मचारी
- मतदार
- उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी
- प्रत्येक उमेदवाराचा  एकावेळी एकच मतदान प्रतिनिधी
- आयोगाने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती
- निरीक्षक

# मतदान केंद्रात प्रवेशाचा हक्क

- मतदाराबरोबर कडेवरील मुल
- अंध / अपंग मतदाराबरोबर आलेली व्यक्ती. (प्राधान्य)
- मतदान केंद्राध्यक्षाचे निर्देशाप्रमाणे ओळख पटविण्यासाठी आलेली व्यक्ती
- पोलीस अधिकारी गणवेशात असो वा नसो मतदान केंद्रात प्रवेश करण्याची परवानगी देऊ नये
- उमेदवाराचा सुरक्षा कर्मचारी यांना प्रवेश नाही

# मतदान प्रतिनिधी

- मतदान प्रतिनिधी हा मतदार सर्व साधारपणे त्याच यादीतील असावा.
- मोबाईल वापरास प्रतिबंध/ धुम्रपानास प्रतिबंध
- एकावेळी एक उमेदवाराचा एकच प्रतिनिधी मतदार केंद्रात असावा
- अतिरीक्त एक प्रतीनीधी नेमू शकतात
- केंद्राध्यक्षांनी दिलेले ओळखपत्र लावलेले असावे.
- मतदानापूर्वी दिड तास अगोदर हजर.
- उशिरा आगमन –सहभागी होऊ द्यावे.
-

# मतदान प्रतिनिधी

- विहित नमुन्यात नेमणूक पत्र सादर करणे.
- प्रतिज्ञापत्रावर मतदान केंद्राध्यक्ष समक्ष स्वाक्षरी.
- नेमणूक पत्र जपून ठेवणे.
- नेमणूक पत्राविषयी संशय—नमुना सहयांवरून पडताळणी.
- प्रतिनिधीकडील मतदार यादी बाहेर घेवून जाण्यास परवानगी नाही.

# मतदान प्रतिनिधी बसण्याची जागा

- मतदार यादीचे चिन्हांकीत प्रतीचे प्राधिकृत अधिका-याचे मागे
- मतदारांचे चेहरे दिसु शकतील
- इकडे- तिकडे वावरण्याची मुभा नाही
- धुम्रपानास व भ्रमणध्वनीस मनाई

# वृत्तपत्र प्रतिनिधी/छायाचित्रकार




- मतदान केंद्रातील छायाचित्रे घेण्यास मुभा नाही
- केंद्राबाहेरील रांगेचे छायाचित्रास मुभा
- मतदार आपल्या मत EVM वर मतदान करत असताना छायाचित्रास मुभा नाही

# मतदारांने ओळख म्हणून सादर करावयाचे पुरावे

1) पासपोर्ट

2) वाहन परवाना

3) आयकर विभागाकडील ओळखपत्र (पॅन कार्ड)

4) केंद्र शासन/राज्य शासन/सार्वजनिक उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी कंपन्या अथवा कारखाने यांनी कर्मचा-यांना दिलेले फोटो ओळखपत्र

5) राष्ट्रीयीकृत बँक / पोस्ट ऑफिस / किसान कार्ड यांचे खतेदारांचे फोटो असलेले पासबुक

6) स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र

# मतदारांने ओळख म्हणून सादर करावयाचे पुरावे

7) राज्य निवडणुक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत सक्षम प्राधिक-याने अ.जा./अ.ज./इ.मा.व./विमुक्त जाती/भटक्या जाती/वि.मा.प्र इत्यादींना फोटोसंहीत दिलेले प्रमाणपत्र्.

8) सक्षम प्राधिका-याने दिलेला फोटोसहीत अपंगत्व दाखला.

9) मालमत्तेबाबतची कागदपत्रे तसेच नोंदणीखत इ. (फोटोसहीत)

10) राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या आधीच्या तारखेपर्यंत दिलेले रेल्वे पास चे फोटो असलेले ओळखपत्र.

11) शस्त्रास्त्र परवाना.

# मतदारांने ओळख म्हणून सादर करावयाचे पुरावे

12) निवृत्ती कर्मचा-यांचे फोटो असलेले पासबूक

13) निवृत्ती कर्मचा-यांच्या विधवा/अवलंबित व्यक्ती यांचे फोटो असलेले प्रमाणपत्र

14) वयस्कर निवृत्ती वेतनधारक/त्यांच्या विधवा यांचे फोटो असलेले ओळखपत्र

15) परीवहन प्राधिकरणाने दिलेला वाहक परवाना.

16) आयोगाने ज्या दिवशी निवडणूक कार्यक्रम निर्गमित केला असेल त्या दिवसाच्या आदल्या दिवशी पर्यंत देण्यात आलेली शिधापत्रिका.


17) आधार कार्ड.

18) मतदान केंद्राध्यक्षास मतदाराची ओळख समाधान कारक रीत्या पटेल असे अन्य कोणतेहि कागदपत्र.

# नमुना ओळख पुरावे


भारत निवडणूक आयोग
ओळखपत्र
ELECTION COMMISSION OF INDIA
IDENTITY CARD
Elector's Name : Rashmi Ashok Mhatre
Husband's Name : Ashok Mhatre
लिंग / Sex : स्त्री / FEMALE


आयकर विभाग
INCOME TAX DEPARTMENT
भारत सरकार
GOVT. OF INDIA
[redacted] KUMAR MAHTO
[redacted] MAHTO
03/04/1982
Permanent Account Number
[redacted]
Signature



THE UNION OF INDIA
MAHARASHTRA STATE MOTOR DRIVING LICENCE
DL No MH-1220050000188
ID 12-12-2005
Valid Till : 11-12-2025 (Non Trans)
(Inv Crg)
FORM 7
RULE 16 (2)
AUTHORISATION TO DRIVE FOLLOWING CLASS OF VEHICLES THROUGHOUT INDIA
COV ID
MCWG 12-12-2005
Badge#
DOB : 12-05-1986
ID
BG : Not
Name POOJA M PALANDE
S/D/W of MILIND PALANDE
Add S NO . 32/14 A/3 , AMBEGAON BK ,
BHARTI VIDYAPEETH BACKSIDE ,
PUNE .
PIN 411046
Signature & ID of Issuing Authority MH-1220051
Signature/Thumb Impression of Holder



महाराष्ट्र शासन
Govt. of Maharashtra
ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र
Senior Citizens ID Card
SENIOR CITIZEN
MUCITY 423251
Name / नांव : Kamal M Thakker
Date of Birth / जन्म तारीख : 02/03/1948 - 60 yrs
Address / पत्ता :
18/3, Devkabai Niwas, K A S Rd
Matunga CR, Mumbai 400 019
Tel / दूरध्वनी : 24013009
Blood Group / रक्त गट : O +ve


भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
रितेश विलासराव देशमुख
Riteish Vilasrao Deshmukh
जन्म वर्ष/YoB: 1977
पुरुष Male
2173 1296 4875
आधार - आम आदमी का अधिकार




पासपोर्ट
PASSPORT
सत्यमेव जयते
भारत गणराज्य
REPUBLIC OF INDI


कौटुंबिक
पुरवठापत्रिका/शिधापत्रिका
महाराष्ट्र शासन


महाराष्ट्र शासन
जिल्हा परिषद, औरंगाबाद
पशुसंवर्धन विभाग
सत्यमेव जयते
ओळखपत्र
नांव : राजेंद्र मुरलीधर वाणी
पद : वरिष्ठ सहाय्यक
जन्म दि.: ०१/०१/१९७७(र.गट O+Ve)
पत्ता : भानुदास नगर, घर नं.४-११-२३२
: जवाहर कॉलनी रोड, औरंगाबाद.
मो. 9890531861
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जि.प., औरंगाबाद
कर्मचारी सही

# अपवादात्मक बाबी

## आक्षेपित मते (CHALLENGE VOTES)

- मतदाराच्या ओळखीबाबत उपस्थित मतदान प्रतिनिधींनी आक्षेप घेतल्यास
- प्रतिनिधीकडुन आक्षेप शुल्क रक्कम रू 2/- जमा करून त्यास रितसर पावती द्यावी
- सादर केलेल्या पुराव्याच्या तपासणी अंती मतदाराची ओळख पटत असेल व तोच मतदार असल्याची खात्री होत असेल तर आक्षेप शुल्क जप्त करून त्या मतदारास मतदान करू द्यावे

# अपवादात्मक बाबी

## आक्षेपित मते (CHALLENGE VOTES)

- मतदाराने ओळखीचे कोणतेही पुरावे सादर न केल्यास प्रतिनिधीची शुल्क परत मिळाल्याबाबत स्वाक्षरी घ्यावी आणि त्या मतदारास पोलिसांच्या ताब्यात द्यावे
- मतदार यादीतील नाव जसे की बाळू /बाळा / बाळासाहेब असे असल्यास ओळखपत्र वरील फोटो व प्रत्यक्ष मतदार याची पडताळणी करून मतदान करू दयावे
- वयाबाबत साशंकता असलेल्या मतदाराचे प्रमाणपत्र घेणे व त्याची विहीत नमुन्यांत नोंद करणे

# अंध,अपंग मतदाराच्या सोबत्याचे प्रमाणपत्र

- मात्र अशा सोबत्याचे सहायाने झालेल्या मतदानाची नोंद VM-5 नमुन्यात ठेवावी
- मतदान नोंदवही मध्ये शेरा कोष्टकी सोबत्याचे स्वाक्षरी असे असा शेरा लिहून आपण स्वाक्षरी करावी

# मतदान न करणारे मतदार

- एखादा मतदान स्वत:ची ओळख पटवून मतदानासाठी मतदान कक्षात गेल्यानंतर ऐनवेळी मतदान न करण्याचा निर्णय घेतल्यास त्याला कोणालाही मतदान करावयाचे नसल्यास तेव्हा त्या मतदारास बळजबरी करु नये व मतदान केंद्राध्यक्ष यांनी मतदान प्रतिनिधी यांचे समक्ष मतदान कक्षात जावुन पुठठयाने उर्वरित बटने झाकुन NOTA बटन दाबावे व तशी नोंद घ्यावी
- शे-याखाली संबंधित मतदाराची स्वाक्षरी घेवून केंद्राध्यक्षांनीही स्वत: ची संपूर्ण सही करावी.
- VM-1 नमुन्यात ठेवावी

# मतदार नोदवहीत सही करण्यास नकार देणारे मतदार

- मतदारांनी सही करण्यास नकार दिला तर अशा मतदारास मतदान करू देवू नये
- मतदार नोंदवहीतील शेऱ्यामध्ये सही करण्यास नकार दिला असा शेरा नमुद करून त्याखाली मतदार व केंन्द्राध्यक्ष यांनी सही करावी
- शेरा रकान्यातही मतदान स्वाक्षरी करण्यास तयार नसेल अशावेळी केंद्राध्यक्षाने मतदार नोंदवहीच्या शे-यामध्ये मतदाराने स्वाक्षरी केली नाही तसेच शेऱ्याच्या रकान्यातही सही करण्यास नकार दिला असे नमुद करून स्वत: ची संपूर्ण सही करावी

# प्रदत्त मते

- एखादा मतदार मतदान करण्यासाठी आल्यास व मतदार नोंदवहीत तसेच चिन्हांकीत मतदार यादीत त्याच्या नावाने यापूर्वीच कोणी तरी मतदान केले असे निदर्शनास आल्यास
- अशा मतदारास त्याच्या ओळखीच्या बाबत पुरावे सादर करण्याची विनंती करावी
- सादर केलेल्या पुराव्याची खात्री पटल्यास त्यास मतदान करण्याची अनुमती द्यावी
- मतदान यंत्रावर मतदान करू देवू नये

# प्रदत्त मते

- अशा मतदारांनी नोंद VM-2 मध्ये घेवून आपल्याकडे असलेली प्रदत्त मतपत्रिका दया
- मतपत्रिकेच्या मागे प्रदत्त मतपत्रिका असे लिहुन त्या मतपत्रिकेवर मत नोंदविण्याची विंनती मतदारास करावी.
- मतदाराने मतदान नोंदविल्यावर सदर मतपत्रिका केंद्राध्यक्षाने आपल्या ताब्यात घ्यावी
- मतपत्रिकांचा हिशोब फॉर्म VM-3 मधील विहीत नमुन्यात अद्यावत ठेवावा.
- मतदारास प्रदत्त मतपत्रिका देण्यापुर्वी त्या मतपत्रिकेच्या मागे आपल्या मतदान केंद्राचे विभेदक चिन्ह उमटवले आहे व केंद्राध्यक्ष यांनी स्वाक्षरी केली आहे याची खात्री करणे आवश्यक आहे.

# ईव्हिएम (EVM) हाताळतांना उदभवना-या अडचणी व उपाय

- **Invalid Option – Colse,Result,Clear या क्रमाने बटने दाबावे.**
- **Link Error - LE –केबल व्यवस्थीत जोडावी.**
- **Pressed Error – PE- बॅलेट युनिटचे बटण दबले नसल्याची खात्री करावी.**

# मतदान यंत्र बंद पडणे

१) बॅटरी संपल्याने

२) वरील प्रमाणे Errors उद्भवल्याने

३) इतर बिघाड (उदा . डिस्प्ले इत्यादी )

- बदलवायचे मतदान यंत्र विहित पद्धतीने सील करणे.
- विहित नमुन्यात केंद्राध्यक्षाने घोषणापत्र करणे .
- Mock Pollकार्यवाही करून प्रतिनिधींसमक्ष सील करणे.

➢ मतदानाचे तास वाढवून देता येणार नाही.

# मतदान सुरू असताना करावयाची कार्यवाही

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक -२०२०  ता. यावल**

# मतदान सुरू असताना करावयाची कार्यवाही

- **दर दोन तासांनी मतदानाची टक्केवारी दयावी.**
- **मतदानात अडथळा नाही याची वेळोवेळी खातरजमा करावी.**
- **विविध कागदपत्रे व घोषणापत्रे वेळोवेळी भरावी.**

# मतदान केंद्राभोवती निवडणूक कायदयांचा अंमल लागू करणे

- नि: पक्षपाती पणा जपणे.
- मतदान केंद्राच्या 100 मी परिसरात प्रचार बंदी.
- उमेदवारांचा निवडणूक मंडप (बुथ) 200 मीटर परिसरा बाहेर.
- स्थानिक प्राधिकरणाकडून बुथ साठी परवानगी आवश्यक.
- बुथ मध्ये 3x4.5 फुटा पेक्षा जास्त लांबी नसलेला फलक लावू शकतात.
- बेबंद वर्तणूक पोलीसाकरवी अटक करू शकतात.

# मतदान केंद्राभोवती निवडणूक कायदयांचा अंमल लागू करणे

- बेशिस्त व्यक्ती मतदान केंद्रातून बाहेर काढावे.
- मतदारांना आणण्यासाठी बेकायदा वाहनाचा वापर करू देवू नये.
- मतदान अधिका-यांनी कर्तव्य भंग केल्यास कलम 34 अन्वये कारवाई.
- मतदान केंद्रात हत्यारे घेवून प्रवेश नाही.
- मतदान केंद्रात मोबाईल वायरलेस वापरण्यास तसेच छायाचित्र घेण्यास मनाई .

# मतदान संपविणे

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक -२०२० ता. यावल**

# मतदान संपविणे

**मतदान समाप्त होण्याचे वेळेस मतदान केंद्रावर हजर व्यक्तीनी करावयाचे मतदान**

- **रांगेतील क्रमांकानुसार मतदान करण्यास परवानगी घोषणा.**
- **रांगेतील शेवटच्या व्यक्तीपासून चिठठया देण्यास प्रारंभ.**
- **रांगेतील पहिल्या व्यक्ती पर्यंत चिठठी देणे.**
- **पूर्ण सही असलेली चिठठी देणे.**
- **मतदान समाप्तीचे प्रतिज्ञापन.**

# मतदान संपले नंतरचे कामकाज

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक -२०२० ता.यावल**

# नमुना व्ही एम-3

# नोंदविलेल्या मतांचा हिशोब

- प्रभागाचे नाव : 10/3 यावल        प्रभाग क्रमांक : 3

1. मतदान केंद्रावरील मतदारांची एकूण संख्या : 410
2. मतदार नोंदवही (नमुना व्हीएम 1) नोंदविलेल्या मतदारांची एकूण संख्या : 305
3. नियम 17 नुसार ज्या मतदारांनी मतदान न करण्याचे ठरविले त्यांची संख्या-निरंक
4. नियम 15 अन्वये मतदानास अनुमती न दिलेल्या मतदारांची संख्या :-निरंक
5. मतदान यंत्रामध्ये नोंदविण्यात आलेल्या मतदारांची एकूण संख्या :- 305
6. बाब 5 समोर दाखविण्यात आलेल्या मतांच्या एकूण संख्येचा बाब 2 समोर दाखविण्यात आलेली मतदारांची एकूण संख्या उणे बाब 3 समोर दाखविण्यात आलेली मत न नोंदविण्याचे ठरविलेल्या मतदारांची संख्या उणे बाब 4 (2-3-4) समोर दाखविण्यात आलेल्या मतदारांची संख्या या वजाबाकीशी मेळ बसतो आहे काय? :-होय
7. नियम 18 अन्वये ज्या मतदारांना प्रदत्त मतपत्रिका देण्यात आल्या त्या मतदारांची संख्या : 01

# नियंत्रण युनिट बंद करणे

- टोटल बटण दाबून एकुण मतांची संख्या नोंदविणे
- CLOSE BUTTON दाबणे
- नियंत्रण युनिट मतदान युनिटपासुन अलग करणे
- Close Button वरील रबरी टोपी पुन्हा लावणे
- CU व BU सिल सहीत योग्य पध्दतीने पेटीमध्ये बंद करणे
- सिल केलेल्या पेटया संकलन केंद्रावर जमा करणे

# निवडणूक विषयक कागदपत्रे मोहोरबंद करणे

अ) मतदान यंत्रासोबत

( दोन प्रतीत  एक ओपन व एक सील बंद पाकीटात ईव्हीएम सोबत)

- व्हीएम-3: मतांचा हिशोब व कागदी मोहोरांचा हिशोब - दोन प्रतित
- मतदान केंद्राध्यक्षाने केलेली घोषणापत्रे :

1. सुरूवातीस
2. दुसरे मतदान यंत्र वापरावे लागल्यास
3. मतदान संपल्यानंतर
4. ईव्हीएम सिल करावा

- मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी.

## ब) सांविधिक लिफाफे (पहिले पाकीट)

1. मतदार याद्यांची चिन्हांकित प्रत लिफाफा.
2. मतदारांची नोंदवही लिफाफा
3. मतदार चिठ्ठ्या लिफाफा.
4. वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका व व्हिएम-2 नमुन्यातील यादी
5. न वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका

(लिफाफयात  कोरे पाकीट ठेवू नये त्यामध्ये चिठ्ठी टाकून निरंक लिहावे.)

## क) असांविधिक लिफाफे (दुसरे पाकीट)

- मतदार यादीची प्रत (चिन्हांकीत प्रतिव्यतिरिक्त)
- मतदान प्रतिनिधीची नेमणूकपत्रे ठेवलेला लिफाफा
  निवडणूक कार्य प्रमाणपत्रे ठेवलेला लिफाफा
- जोडपत्र-13 नुसार आक्षेपित (आव्हानीत) मतांची यादी ठेवलेला मोहोरबंद लिफाफा
- अंध व अपंग मतदारांची व्हीएम-5 मधील यादी
- मतदाराच्या सोबत्यांची प्रतिज्ञापत्रे ठेवलेले लिफाफे
- आपेक्षित (आव्हानीत) मतांबाबतचे पावती पुस्तक व रोकड ठेवलेला लिफाफा
- न वापरलेल्या व खराब झालेल्या मोहोरा ठेवलेला लिफाफा
- न वापरलेल्या मतदार चिठ्ठया लिफाफा

- न वापरलेल्या व खराब झालेल्या विशेष खुणचिठ्ठ्या ठेवलेला लिफाफा
- न वापरलेल्या व खराब झालेल्या (ए.बी.सी.डी.) पट्टी सिल ठेवलेला लिफाफा
- मतदारांकडून त्यांच्या वयाबद्ल घेतलेली प्रतिज्ञापत्रे आणि अशा मतदारांची यादी लिफाफा

## ड) तिसरे पाकीट

1. मतदान केंद्राध्यक्षांसाठी निर्देशपुस्तिका
2. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची नियमपुस्तिका
3. पक्क्या शाईचा संच/ मार्कर पेन
4. शाईची पॅडस्
5. मतदान केंद्राध्यक्षाची धातूची मोहोर
6. प्रदत्त (दुबार) मतपत्रिकांवर खुण करण्यासाठी बाणफुलीचे चिन्ह असलेला रबरी शिक्का
7. पक्की शाई ठेवण्यासाठी कप

## इ) चौथे पाकीट

इतर उरलेले साहित्य असलेले पाकीट

# घोषणापत्र / प्रमाणपत्र

- मतदान सुरू करण्यापूर्वीचे घोषणापत्र
- दुसऱ्या मतदान यंत्राचा वापर करतांना करावयाचे घोषणापत्र
- C.R.C. प्रमाणपत्र
- मतदान संपल्यानंतरचे घोषणापत्र
- मतदान यंत्र सिलबंद केल्यानंरत करावयाचे घोषणापत्र
- केंद्राध्यक्ष दैनंदिनीत मतदान प्रक्रिया दरम्यान घडलेल्या घटनांची नोंद करणे

# PRO Handbook मधील End बाबत सुधारणा

# मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे करीता सुचना

- तिस-या प्रशिक्षणावेळी आपल्याच गावातील मतदान केंद्रावर आपली नियुक्ती झाली असल्यास पोलींग पार्टी रवाना होण्यापुर्वी आमच्या निदर्शनास आणुन द्यावे व मतदान केंद्र बदलुन घ्यावे व त्याची जबाबदारी आपली राहील

# परतीचा प्रवास

- सर्व साहीत्य सुस्थीतीत घेऊन अधीकृत वाहनाने परतीचा प्रवास करावा

- सोबत पोलीस कर्मचारी






- संकलन केंद्रावर टेबल निहाय साहीत्य जमा करावे

- सर्व साहीत्य परत करून पोहच व भारमुक्त आदेश घेऊनच साहीत्य स्वीकृती केंद्र सोडावे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २ ऑगस्ट, २००६.

परिपत्रक

भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के अन्वये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाली आहे. त्या अनुच्छेदांतर्गत सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ झेडए अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२४ अन्वये भारत निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. अनुच्छेद ३२४ व अनुच्छेद २४३ के मध्ये केवळ तीन फरक आहेत व त्यातील पहिला फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाकडून राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, संसदेची दोन्ही सभागृहे व राज्य विधानमंडळे यांच्या निवडणुका घेण्यात येतात तर राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका घेण्यात येतात. दुसरा फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते. राज्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते. तिसरा फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाला जे अधिकारी/कर्मचारी लागतात ते राष्ट्रपती उपलब्ध करुन देतात. राज्य निवडणूक आयोगाला जे अधिकारी/कर्मचारी लागतात ते राज्याचे राज्यपाल उपलब्ध करुन देतात. हे तीन फरक सोडल्यास या दोन्ही अनुच्छेदांमध्ये काहीही फरक नाही.

२. भारत निवडणूक आयोगाने भारत सरकार व इतर शासन यांच्याविरुध्द १९९३ साली एक रिट याचिका दाखल केली होती. (रिट याचिका क्रमांक-६०६/१९९३) या याचिकेमध्ये भारत निवडणूक आयोगाला विधानसभा व लोकसभा निवडणुकीत जे अधिकारी व कर्मचारी निवडणुकीचे काम करीत असतात, त्यांच्याविरुध्द कामात निष्काळजीपणा दाखविल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत की नाही असा मुद्दा उपस्थित झाला होता. सुरुवातीला केंद्र शासनाने व इतर राज्य शासनाने अशी भूमिका घेतली होती की, निवडणुकीत काम करणारे अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार केंद्र शासनातील अधिकारी व कर्मचा-यांच्याबाबतीत केंद्र शासनाला व राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्याबाबतीत राज्य शासनाला आहेत. केंद्र व राज्य शासन या भूमिकेविरुध्द भारत निवडणूक आयोगाने ही रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेत दिनांक-२६ जुलै, २००० रोजी भारत निवडणूक आयोग, केंद्र शासन व इतर राज्य शासन यांच्यामध्ये एक करार झाला. हा करार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद करण्यात आला आहे. या करारान्वये भारत निवडणूक

आयोगाला निवडणुकीत काम करणारे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी जे निवडणुकीच्या कामासाठी नेमलेले असतात त्यांच्याविरुध्द पुढील कारवाई करण्याचे अधिकार आहेत:-

(१) निवडणुकीसाठी नेमलेले कोणतेही अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा त्यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल निलंबित करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत.

(२) कोणतेही अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्याऐवजी दुसरा योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करणे व त्या व्यक्तीच्या जागी दुस-या अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली असेल त्याला त्याच्या मूळ विभागात परत पाठविणे व त्यासोबत त्यांच्या वागणुकीबद्दल योग्य तो अहवालसुध्दा पाठविणे.

(३) सक्षम प्राधिका-यास एखादा अधिकारी किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल त्याने वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा दिलेल्या निवडणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल शिफारस करणे. अशा शिफारशीवर शिस्तभंगाची कारवाई करणा-या अधिका-याकडून तात्काळ कार्यवाही होईल आणि निवडणूक आयोगास अशी कारवाई केल्याची माहिती शिफारस केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत कळविण्यात येईल.

३. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद केलेल्या करारात केंद्र शासन व इतर राज्यांसोबत महाराष्ट्र शासनसुध्दा पक्षकार होते व त्यांनी या कराराप्रमाणे कार्यवाही करण्याचे मान्य केले आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२४ व २४३ झेडए यांच्यामध्ये निवडणुकीच्या बाबतीत फरक नसल्याने हा करार राज्य निवडणूक आयोगातर्फे घेण्यात येणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी तसेच पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्या बाबतीतही लागू होतो. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगास पुढीलप्रमाणे अधिकार प्राप्त आहेत:-

(१) निवडणुकीसाठी नेमलेले कोणतेही राज्य शासनाचे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा त्यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल निलंबित करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहेत.

(२) कोणतेही राज्य शासनाचे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी/कर्मचारी, अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्याऐवजी दुसरा योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करणे व त्या व्यक्तीच्या जागी दुस-या अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली असेल त्याला त्याच्या मूळ विभागात परत पाठविणे व त्यासोबत त्यांच्या वागणुकीबद्दल योग्य तो अहवालसुध्दा पाठविणे.

(३) सक्षम प्राधिकाऱ्यास एखादा अधिकारी किंवा कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल त्याने वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा दिलेल्या निवडणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल शिफारस करणे. अशा शिफारशीवर शिस्तभंगाची कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्याकडून तात्काळ कार्यवाही होईल आणि निवडणूक आयोगास अशी कारवाई केल्याची माहिती शिफारस केल्याच्या तारखेपासून **सहा महिन्यांच्या आंत** कळविण्यात येईल.

४. निवडणुकीचे काम प्रभाग रचनेपासून सुरु होते. निवडणुकीच्या कामात प्रभाग रचना करणे, मतदार याद्या तयार करणे, मतपत्रिका छापणे, निवडणुकीच्यावेळी मतदान यंत्र अथवा मतपेटया तयार करणे, मतदान यंत्रे अथवा मतपेटया सील करणे, निवडणुकीचे साहित्य विकत घेणे, त्यांचे वाटप करणे, मतदानाच्या दिवशी प्रत्यक्ष काम करणे, मतमोजणी करणे, निवडणुकीनंतर कागदपत्रे, मतपेटया व मतदान यंत्रे हे अधिनियमातील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाच्या अनुषंगिक आदेशानुसार व्यवस्थित ठेवणे, निवडणुकीच्या सर्व कामांची सुरक्षा ठेवणे इत्यादी कामांचा समावेश होतो. या सर्व कामात सहभागी असणारे अधिकारी/कर्मचारी तसेच निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून नेमलेले अधिकारी व पोलिस अधिकारी/पोलिस कर्मचारी यांनी हलगर्जीपणा दाखविल्याबाबत किंवा वरिष्ठांचे आदेश न पाळल्याबाबत परिच्छेद-३ प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतील.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रत:-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२) सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
३) सर्व विभागीय आयुक्त
४) पोलिस महासंचालक, मुंबई
५) सर्व महानगरपालिका आयुक्त
६) सर्व पोलिस आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व पोलिस अधिक्षक
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) सर्व गट विकास अधिकारी
११) सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायती
१२) सर्व तहसिलदार
१३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

श्री. महेश पवार,
तहसीलदार यावल तथा,
प्राधिकृत अधिकारी, राज्य निवडणूक आयोग



# !! धन्यवाद !!